तक्रारकर्ते यांचेतर्फे सत्यापन शपथेवर सुरु.

मी, याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

नाव – योगीता योगीनाथ पाटील,
वय – ४० वर्ष,
धंदा – शेतमजुरी,
पत्ता – गुमगांव, तह. सावनेर, जि. नागपूर.

कु. जे.एच.शेंडे वकीलांमार्फत साक्षीदार क्र.०२ यांचा सरतपास शपथेवर सुरु.

ग्रामपंचायत गुमगांव यांनी यांनी आम्हाला १०,००० रोपे तयार करण्याचा ठेका दिला. त्या, रोपांच्या सुरक्षिततेकरिता आम्ही आमच्या शेतातल्या ४५ बल्ल्या लावल्या. त्यांची रक्कम ग्राम सचिव व सरपंच डोमा यशवंत खडसे यांनी मला दिली नाही. आम्ही त्यांना बल्ल्यांच्या पैश्यांची वारंवार मागणी केली असता माधुरी विनायकराव शेंडे, डोमा यशवंत खडसे व ग्रामपंचायतीतील चपराशी आमच्या रोपवाटीकेत यायचे व पैसे मागीतले असता शिवीगाळ करायचे, उलटसुलट बोलायचे. “साली मादरचोद” असे डोमा यशवंत मला बोलायचे व शिवीगाळ करायचे. त्याबाबत आम्ही त्यांची तक्रार पोलीस स्टेशन, खापा येथे दिली असता त्यांनी दिनांक ०४/०७/२०१३ रोजी सुखराम यादव थोटे–पोलीस उपनिरिक्षक, माधुरी विनायकराव शेंडे–ग्रामसचिव, डोमा यशवंत खडसे, दिनेश जिभे–चपराशी, रवि जिभे–होमगार्ड, राहुल जिभे–होमगार्ड, हेमराज जिभे–होमगार्ड, देवानंद डोखोडे–होमगार्ड (नोकरी–पोलीस) व मनोज सोरमारे–सदस्य ग्रामपंचायत असे ०९ लोक रोपवाटीकेमध्ये आले. त्यावेळी माधुरी शेंडे याव्यतिरिक्त सर्व लोक दारु पिऊन आले व ते शुध्दीमध्ये नव्हते. सुखराम यादव थोटे–पोलीस उपनिरिक्षक यांनी मला “साली मादरचोद, जिंदा गाड दुंगा, जला दुंगा, सौ दिन से भी ज्यादा काम किया है तो ४२० मे डाल दुंगा.” डोमा यशवंत खडसे यांनी “साली मादरचोद” अशी अश्लील शिवीगाळ केली. चपराशी यांनी “भोसोडीची” अशी शिवीगाळ केली. रवि जिभे म्हणाले की, ”हे लोक असेच आहे.” देवानंद डाखोडे बोलला की, ”नालायक आहे ही बाई.” सदरचे लोक दारुच्या नशेमध्ये 'साली साली' असे बोलत होते. माधुरी शेंडे त्यांना शिवीगाळ करण्यास प्रोत्साहन देत होती. थोड्याच वेळात माझे पती

तिथे आले असता सुखराम यादव थोटे यांनी माझे पतीवर मारण्याकरिता हात उगारला. त्यानंतर माझ्या पतीने त्यांना "रोपे नेण्याबाबत लिहून द्या" असे म्हटले असता ते मान्य झाले. त्यानंतर ते निघून गेले त्यावेळी मी सुखराम यादव थोटे यांना ओळखत नव्हती. त्यावेळी मी रोपवाटीकेमध्ये एकटीच होती. दिनांक ०५/०७/२०१३ रोजी जेव्हा ते रोपे नेण्याकरिता आले त्यावेळेला त्यांनी जबरदस्तीने १२,०० रोपे दमदाटी करुन आमच्याकडून नेले. त्यावेळी त्यांनी जिवे मारण्याची धमकी दिली. पतीला ढकलढुकल केली. डोमा यशवंत खडसे, सुखराम थोटे यांनी माझे पतीला अश्लील शिवीगाळ केली. सुखराम थोटे तिन वेळा आमच्या रोपवाटीकेमध्ये आले, त्यावेळेला ते त्यांचे युनीफॉर्म मध्ये नव्हते. त्यांनी आमचे १२,०० रोपट्यांचे पैसे दिले नाही. दिनांक २५/०७/२०१३ रोजी सुखराम थोटे आमच्या वाटीकेमध्ये आले होते, त्यावेळीदेखील ते युनीफॉर्म मध्ये नव्हते. तिन्ही वेळेला ०९ लोक आमचे रोपवाटीकेमध्ये आले होते. सर्वांनी आमचेसोबत अभद्र व्यवहार केला, क्रुरतेने वागले त्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करुन शिक्षा द्यावी व आम्हाला न्याय द्यावा.

सरतपास पुर्ण.

वा.दा.का.दा. | **श्रवणोत्तर स्वीकृत समक्ष**

स्वा./–

**(प्रियंका पी. नातू)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**न्यायालय क्र.०३, सावनेर, जि. नागपूर.**

स्वा./–

**(प्रियंका पी. नातू)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**न्यायालय क्र.०३, सावनेर, जि. नागपूर.**

दिनांक १५/०२/२०२२

## प्रमाणपत्र

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – महेश ल. इंगळे